# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**जावक क्रमांक :- १९९** **दिनांक :- २२/०७/२०२१**

## श्री संजय पांडे, पोलीस महासंचालक यांचे हस्ते पोलीस उपआयुक्त (गुन्हे) व पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१ च्या नवीन कार्यालयाचे उद्‌घाटन व पोलीस अधिकारी, अंमलदार यांचेशी संवाद.

श्री संजय पांडे, पोलीस महासंचालक यांनी आज दिनांक २२/०७/२०२१ रोजी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयास भेट दिली. सदर भेटीदरम्यान पोलीस आयुक्तालयातील पोलीस उपआयुक्त गुन्हे शाखा व पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१ यांच्या कनकिया रोड, मिरा रोड येथील नवीन कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. मा. पोलीस महासंचालक यांनी नव्याने निर्मीत कार्यालयाची पाहणी केली. त्यानंतर पोलीस महासंचालक यांनी पोलीस आयुक्तालय येथे भेट देवून पोलीस आयुक्तालयातील 'ई ऑफिस' कार्यप्रणाली कामकाजाचे औपचारिक उद्‌घाटन केले. तसेच आयुक्तालयातर्फे बनविण्यात आलेल्या चारित्र्य पडताळणी पध्दतीबाबतच्या चित्रफितीचे अनावरण केले. तसेच कार्यालयाचे इतर कामकाजाची पाहणी करून आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेशी संवाद साधला.

भेटीदरम्यान पोलीस महासंचालक यांनी पोलीस आयुक्तालयातील कामकाजाचे व उपक्रमाचे कौतुक करुन सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना जनताभिमुख कर्तव्य करण्याबाबत मार्गदर्शन केले.

सदर दौ-यावेळी श्री. संजय पांडे, पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेसमवेत श्री संजीव कुमार सिंघल, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, श्री. एस. जयकुमार, अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई विरार हे उपस्थित होते.

-----oooo-----






-----oooo----